महावितरण

# जाहिर निवेदन

शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये एका वर्षा (२०२१-२०२२) करिता आय.टी.आय. शिकाऊ उमेदवार म्हणून भरती प्रक्रिया संबंधी महावितरण मंडळ कार्यालय जालना यांच्या आस्थापनेवरील विजतंत्री / तारतंत्री या प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवार पदाच्या एकूण १३३ जागा भरण्यासाठी एस.एस.सी व आय.टी.आय उत्तीर्ण (विजतंत्री/तारतंत्री) NCVT अंतर्गत उत्तीण झालेल्या उमेदवारांचे Designated Trade हा ELECTRICIAN/WIREMAN व Apprentices Training Period एक वर्षा करीता, दिनांक २२/०१/२०२१ ते २९/०१/२०२१ पर्यंत रोजी संध्याकाळी ५:३० पर्यत आस्थापना क्र. E11162706647 वर ऑन लाईन (on line) अर्ज मागविण्यात येत आहे. **Designated Trade हा ELECTRICIAN/WIREMAN व Apprentices Training Period एका वर्षाकरीता असुन विजतंत्री/ तारतंत्री यांच्या १३३ जागा भरावयाच्या आहेत.** (१) शैक्षणीक अर्हता : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधून विजतंत्री/तारतंत्री व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (२) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारांसाठी ३० वर्ष, मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३५ वर्ष (३) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्ष (४) विद्यावेतन नियमाप्रमाणे (५) पदे कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे **(६) सदर भरती हि फक्त जालना जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असेल. इतर जिल्हयातील उमेदवारांच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.** (७) एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व सनद प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (८) आय.टी.आय. उत्तीर्ण प्रमाणपत्र (चार सेमिस्टर गुण पत्रिका) (९) उमेदवाराने मागास प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची छायांकीत प्रत (१०) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (११) प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावून घेणे बंधनकारक नाही याची नोंद घ्यावी. उमेदवारांनी ऑनलाईन (online) अर्ज करतांना (www.Apprenticeship.gov.in) पोर्टलवर खालील प्रमाणे मुळ प्रमाणपत्र स्कॅन करुन योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक असून तयाची एक प्रत अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालय, मानव संसाधन विभाग, जालना येथे दि. ०३/१०/२०१९ रोजी संध्याकाळी ५:३० पर्यंत सादर करावी. वरील कालावधीत ऑनलाईन (online) अर्ज व (online) अर्जाची प्रत सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवारांनी अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी दिनांक ०८/०२/२०२१ व ०९/०२/२०२१ रोजी सकाळी १०:३० वाजता अधीक्षक अभियंता, जालना मंडळ यांचे कार्यालय, महावितरण कंपनी मर्या. कर्मचारी वसाहत, कन्हैय्यानगर, देऊळगाव राजा रोड, जालना येथे हजर रहावे. शिकाऊ उमेदवारांची निवड झाल्यानंतर काही कारणास्तव अप्रेंटीस बोर्ड मुंबई यांच्याकडून उमेदवारांची नोंदणी नाकारल्यास आपली शिकाऊ उमेदवारी आपोआप रद्द होईल.

**पी.आर.ओ.क्र.१२२** **अधीक्षक अभियंता,मंडळ कार्यालय जालना.**